# वसुंधरा

**Environment Conservation & Research Organisation(ECRO)**

''नेस्ट'' प्लॉट नं. ९५, अरुणोदय हौसींग सोसायटी राजेंद्र नगर, कोल्हापूर.

## मानपत्र

### मा. प्रा. डॉ. सुवर्णा बाळकृष्ण मोरे

आपण प्राणीशास्त्र या विषयाच्या अभ्यासू व विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका म्हणून गेली पंचविस वर्षे अध्यापनाचे व्रत पार पाडत आहात. कवठेमहांकाळ सारख्या अतिशय ग्रामिण आणि आवर्षणग्रस्त भागात राहूनही आपण करत असलेली जैवविविधतेविषयक जनजागृती,संशोधन व संवर्धन या सर्व अत्यंत मौलिक गोष्टी आहेत.

आपले घर हे जणू पशू पक्षांची प्रयोगशाळाच आहे. यावरून संतानी सांगितलेली भूतदया ही केवळ आपल्या विचारातच नव्हे तर आचरणातही दिसते. पश्चिम घाटातील ''कोटी'' या प्राण्यावरील अभ्यासाने महाराष्ट्रातील या प्राण्याला आपण जगाच्या नकाशावर आणलात.

जैवविविधतेविषयक आपण करत असलेल्या या मौलिक कार्याबद्दल आपणास

२०१६-१७ सालचा

## "राज्यस्तरीय निसर्ग मित्र पुरस्कार"

देऊन गौरव करण्यात येत आहे.

संस्थेने केलेल्या गौरवामुळे आपल्या आयुष्याला नवी चेतना मिळावी, आपल्या पुढील कार्याला हार्दिक शुभेच्छा.................!

स्थळ-आंबा (मानोली) दिनांक- ८ फेब्रुवारी २०१७

**प्राचार्य डॉ.एस.आर.पाटील**

अध्यक्ष-वसुंधरा

सोमवार, १३ फेब्रुवारी २०१७ तरुण भारत

# डॉ. सुवर्णा मोरे यांना निसर्गमित्र पुरस्कार प्रदान

वार्ताहर
आंबा

मानवाला स्वतः जगायचे असेल तर निसर्ग वाचवला पाहिजे. असे प्रतिपादन प्रा. डॉ. सुवर्णा मोरे यांनी केले. चिखली (ता. शिराळा) येथील देशभक्त आनंदराव बाळवंतराव नाईक महाविद्यालयाने मनोली (आंबा) येथे आयोजित केलेल्या निसर्ग परिचय शिबिरात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. एस. आर. पाटील होते. या प्रसंगी वारणानगर येथील वसुंधरा निसर्ग मंडळाच्या डॉ. सुवर्णा मोरे यांना "राज्यस्तरीय निसर्ग मित्र पुरस्कार" प्रदान करण्यात आला.

पर्यावरणशास्त्राचा अभ्यास निसर्गात राहूनच करावा या उद्देशाने चिखली येथील महाविद्यालय गेली नऊ वर्ष आंबा परिसरात विद्यार्थ्यांसाठी हे शिबिर आयोजित करत आहे. शिबिरात प्रा. सुरेश गायकवाड, डॉ. नितीन शिंदे, डॉ. एस. आर. पाटील, डॉ. प्रकाश दुकळे, डॉ. रेखा देवकर यांची पर्यावरण रक्षण आणि संवर्धन संबंधी व्याख्याने आयोजित केली होती. शिबिराचे नियोजन प्रा. एस. आर माने, प्रा. शुभांगी कांबळे, प्रा. विमल शिरसाट, डॉ. नीता जोखे, डॉ. संजय चिंदगे यांनी केले.




**मनोली : येथे डॉ. सुवर्णा मोरे यांना राज्यस्तरीय निसर्ग मित्र पुरस्कार प्रदान करताना प्राचार्य एस. आर. पाटील .सोबत मान्यवर.**